मी घडला प्रकार अण्णांच्या कानावर घातला. ते म्हणाले, 'मी चिठ्ठी देतो ती घेऊन जा.' त्यांनी दिलेली चिठ्ठी मी त्या अधिकाऱ्यास दिली. ती वाचून तो अधिकारी म्हणाला, 'आधी का नाही सांगितलं, की गाणी माडगूळकरांची आहेत म्हणून ?' मी त्यांना म्हणालो, 'आपण माझ्याशी वेळ काढून नीट बोलायलाच तयार नाही, तर मी तुम्हाला ही गोष्ट कधी सांगणार ?' ते म्हणाले, 'चला- ऐकवा ती तुमची गाणी.' गाणी ऐकल्यावर तो अधिकारी म्हणाला, 'गोरी गोरीपान ठीक आहे. पण ते एका तळ्यात बदक होती काय नि बेडूक होते काय, हे काय गाणं आहे ? तुम्ही हे गाणं बदलून घ्या.' माझ्या लक्षात आले- येथे काही बोलण्यात अर्थ नाही. मी बाहेर पडून सरळ अण्णांकडे गेलो. अण्णा म्हणाले, 'काय झालं ?' मी त्यांना म्हणालो, 'अण्णा, तुम्हीदेखील कमाल करता. काय गाणी लिहिता ? बदक काय नि बेडूक काय. कोण घेणार अशी गाणी ?' अण्णा म्हणाले, 'कोण बोलले हे ?' मी त्यांना सर्व सांगितले. अण्णा म्हणाले, 'या लोकांना गाणी कधीपासून कळू लागली ? थांब तू.' असे म्हणून त्यांनी एच.एम.व्ही.त फोन लावून दुसऱ्या दिवशी त्या अधिकाऱ्याला भेटीसाठी बोलाविले व मलाही यावयास सांगितले.

दुसऱ्या दिवशी मी गेलो तेव्हा ते अधिकारी अगोदरच तेथे येऊन बसलेले होते. मला पाहून ते चमकले. मग अण्णांनी त्यांना विचारले, 'काय हो, कोण म्हणाले की तळ्यात बदक काय नि बेडूक काय ?' ते ऐकून तो अधिकारी मनोमन काय ते समजला. पण वरकरणी हसत म्हणाला, 'यांनी येऊन तुम्हाला सांगितलेले दिसते. अहो, मी ते मस्करीत बोललो. यांना ती मस्करी कळली नाही असे दिसते. तुमच्या गाण्याला कोण नाव ठेवणार ? फारच अप्रतिम लिहिली आहेत तुम्ही ती.' यावर अण्णा म्हणाले, 'ते जाऊ द्या. गाणी कधी रेकॉर्ड करता ते सांगा.' ते म्हणाले, 'लगेच करायला घेतो.' यानंतर भराभर चक्रं फिरली. आशाबरोबर गाण्याच्या पुन्हा रिहर्सल्स झाल्या. आशाला गाणी फार आवडली होती. ती फारच हुशार गायिका आहे. कुठलेही गाणे ती सहजगत्या पिकअप् करते- हे तिचे मोठे वैशिष्ट्य. अशा गायिकेने माझी पहिली रेकॉर्ड गावी, यापेक्षा दुसरा आनंद काय! रेकॉर्ड रिलीज झाल्यावर अतिशय गाजू लागली. त्यामधून पुन्हा एक भानगड उभी राहिली.

मी रेकॉर्ड केलेल्या दोन गाण्यांपैकी 'एका तळ्यात होती' हे गीत 'प्रभात'च्या केळकरांनीही त्यांच्या 'सुखाचे सोबती' या चित्रपटात वापरले होते. ते गायिले होते मधुबाला जव्हेरींनी. आमची रेकॉर्ड